# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. माअधि/अपिल/११/२०१८
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका.
दि.०८/०२/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (संगणक), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

श्री.कृष्णा सी.गुप्ता, ....... **अपिलार्थी**
एस/१०६, पटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.),
ठाणे. ४०११०१

**विरुध्द**

जनमाहिती अधिकारी तथा ....... **प्रतिवादी**
सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**-: विवेचन :-**

श्री.कृष्णा सी.गुप्ता, भाईदर (पुर्व) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.१२/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

1) Please give me the information of total expenditure done on the MBMC's website, along with contractor/service provider/company name.
2) Give the contract/terms and condition/agreement copy.
3) Give information of how many times the website http://www.mbmc.gov.in/ is updated, if any payment has been initiated for website updating then give the Bil copy.

**अपिल दाखल करण्याची कारणेः-**

मागितलेली माहिती दिलेली नसल्याने अपीलार्थी यांनी दि.१५/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (संगणक) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु सदर अपिल हे दि.२९/०१/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

**सुनावणीचा तपशिलः-**

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सिस्टिम मॅनेजर, संगणक विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०९/०२/२०१८ रोजी दुपारी १२.४० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ/आस्था/२१०/२०१७-१८ दि.०३/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले. सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सिस्टिम मॅनेजर, संगणक विभाग व अपिलार्थी अर्जदार उपस्थित आहेत.

१) अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवादः- माझ्या दि.१२/१२/२०१८ रोजीच्या अर्जाप्रमाणे संगणक विभागाकडून माहिती देण्यात आली नाही.

२) जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवादः- अपिलार्थी अर्जदार यांना ७ दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जन माहिती अधिकारी तथा सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्देनिहाय माहिती ७ दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. तसेच यापुढील माहिती अधिकारांतर्गत प्राप्त अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (संगणक)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रतिः-**

१) श्री.कृष्णा सी.गुप्ता,
एस/१०६, पटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.),
ठाणे. ४०११०१

२) जन माहिती अधिकारी तथा
सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग

३) माहिती अधिकार अपील नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (संगणक) यांचे कार्यालय